**पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रात विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणाऱ्या तातडीच्या योजना/ उपाययोजना मंजूर करण्यासाठी स्थायी समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.टंचाई-२००२/प्र.क्र.३४५/पापु-१४,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- २७ नोव्हेंबर, २००२**

**संदर्भ :-**

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई-३०९९/प्र.क्र.१३/पापु-१४, दिनांक ०१ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई-२०९९/प्र.क्र.१४/पापु-१४, दिनांक ०२ फेब्रुवारी, १९९९.
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ०३ फेब्रुवारी, १९९९.
४) महसूल व वन विभागाचे दि.२८ ऑगस्ट, २००२ चे पत्र क्र.सीएलएस-५९९०/प्र.क्र.७९२/म-३

**प्रस्तावना :-**

१. राज्यातील नागरी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजना घेण्यासंदर्भात संदर्भ क्र.०२ येथील शासन निर्णयान्वये एकत्रीत आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत. त्यात नागरी भागात पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या उपायायोजना अटी/शर्ती व निकष तसेच वित्तीय मर्यादा, इत्यादी बाबी विहित करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे "क" वर्गीय नगरपालिकांसाठी रु. सहा लक्ष, "ब" वर्गीय नगरपालिकांसाठी रु. दहा लक्ष, "अ" वर्गीय नगरपालिकासाठी रु. वीस लक्ष व महानगरपालिकांसाठी (मुंबई व बृहन्मुंबई वगळून) रु. पंचवीस लक्ष ही वित्तीय मर्यादा विहित करण्यात आलेली आहे. तसेच, रु. पाच लक्ष पर्यंतच्या योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व रु. दहा लक्ष पर्यतच्या योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या विविध उपाययोजनांसाठी संदर्भ क्रं.१ व ३ येथील स्थायी ओदशान्वये काही भौतिक निकष निश्चित करण्यात आले आहेत.

२. वर नमुद केलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त किंमतीच्या योजना असल्यास किंवा त्या विहित भौतिक निकषात बसत नसल्यास आवश्यकतेनुसार विशेष बाब म्हणून महसूल व वित्त विभागच्या सहमतीने मंजूर केल्या जातात. यात बराच कालापव्यय होऊन योजना तातडीने मंजूर करुन कार्यन्वीत होण्यास अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील आवश्यक भासणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजूरी प्रदान करता यावी म्हणून संदर्भ क्रं.४ अन्वये मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य स्तरीय बैठकीमध्ये यासाठी सचिव स्तरीय स्थायी समिती स्थापन करण्याची शिफारस केली आहे.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती लक्षात घेता, नागरी व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्रदान करण्यात आलेल्या आर्थिक मर्यादेपेक्षा जास्त किंमतीच्या असलेल्या तसेच विहित निकषात न बसणाऱ्या तातडीच्या योजना/उपाययोजनांना तातडीने प्रशासकीय मंजूरी देता यावी म्हणून खालीलप्रमाणे स्थायी समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २. | सचिव (म.व.पु.) महसूल व वन विभाग | सदस्य |
| ३. | सचिव (ग्रा.वि.) ग्रामविकास व जलसंधारण विभाग | सदस्य |
| ४. | सचिव (व्यय), वित्त विभाग | सदस्य |
| ५. | सचिव (१), नगर विकास विभाग | सदस्य |
| ६. | सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ७. | उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य सचिव |

२. वर नमूद केलेल्या समितीस आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी किंवा अन्य संबंधीत अधिकाऱ्यास बैठकीस बोलावण्याचे अधिकार असतील.

३. वरील समितीने प्राप्त झालेल्या योजनांच्या प्रस्तावावर, शक्य तितक्या लवकर निर्णय घ्यावा.

४. सदर शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग, नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र.११४६/व्यय-३ दिनांक १५ नोव्हेंबर, २००२ अन्वये निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
मा.मंत्री (पा.पु.व स्व.वि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्य मंत्री (पा.पु.व स्व.वि.) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (ग्रावि), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
संचालक, नगर पालिका प्रशासन, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (सर्व)
मुख्य अधिकारी नगरपरिषद (सर्व)
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व कार्यासने (पा.पु. व स्व.वि.)
पापु-१४ संग्रहासाठी